**नियमित फौजदारी खटला क्र. २७/२०२५**
**महा. शासन वि. अनिकेत आप्पासो शिंदे**
**निशान क्रमांक- १८/क**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - २ ची जबानी)**
मी देवाशपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | सागर मधुकर कांबळे |
| वय | - | ४५ वर्षे |
| व्यवसाय | - | मजुरी |
| पत्ता | - | कसबा वाळवे, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**शासनातर्फे सरतपासणी विशेष सरकारी अभीयोक्ता श्री. एस. बी. कांबळे यांचे तर्फे शपथेवर पुढे सुरु-**

१. दि.१२/०३/२०२४ रोजी कसबा वाळवे गावी श्री. मारूती कोकाटे यांचे शेताजवळ कॅनॉलपाशी मी पंचनामेकरीता गेलो नव्हतो. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकूर देखील माझे माहितीचा नाही.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, कसबा वाळवे गावी सागर मधुकर कांबळे या नावचा मी एकमेव इसम आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/०३/२०२४ रोजी मी कसबा वाळवे गावी कॅनॉलजवळ पोलीसांसोबत पंचनामेकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरील ठिकाणी मारूती शिंदे हजर होते व त्यांनी त्यांची व इतर ५ जणांची विहीरीवरील मोटरपंप चोरीला गेल्याची घटना सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, मारूती शिंदे यांनी ती जागा आम्हाला दाखविली व पोलीसांनी माझे समक्ष सदरील ठिकाणचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा मी वाचून त्यावर माझी

सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर माझीच सही आहे आणि आरोपीला मदत करण्यासाठी आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. यु. एम. मानकर वकील यांनी नाकारला**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

दि. २०/०८/२०२६ **(एन. पी. काकडे)**

राधानगरी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

(न्यायालय क्र. २), राधानगरी